# घटक २ : अर्वाचीन कविता

## आम्ही कोण? — केशवसुत

अनुक्रमणिका


**२.०. उद्दिष्टे**

**२.१ प्रास्ताविक**

**२.२ शब्दार्थ आणि टीपा**

**२.३ कवितेचे अध्ययन**

२.३.१ यंत्रयुगातील प्रतिमाचित्र

२.३.२ कवितेची रूपचिकित्सा

२.३.३ काव्यभाषेचे स्वरूप

२.३.४ प्रतीक आणि प्रतिमा

२.३.५ मर्ढेकरांची काव्यशैली

**२.४ नमुना उत्तरे**

**२.५ अधिक अध्ययन**

२.५.१ कवि-परिचय

**२.६ सारांश**

**२.७ सरावासाठी स्वाध्याय**

**२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके**

## २.० उद्दिष्टे

केशवसुतानंतर मर्ढेकरांच्या कवितेमुळे मराठी कवितेत जे परिवर्तन झाले ते रुपात्मक आणि वृत्त्यात्मक होते.

प्रस्तुत कवितेचे अध्ययन केल्यावर तुम्हाला–

- मर्ढेकरांच्या कवितेचे वेगळेपण स्पष्ट करता येईल.
- मर्ढेकरांच्या कवितेमुळे मराठी कवितेत झालेल्या परिवर्तनाची वैशिष्टचे विशद करता येतील.
- केशवसुत आणि मर्ढेकर यांच्या कवितेची तुलना करता येईल.
- मर्ढेकरांच्या कवितेचा सौंदर्यास्वाद घेता येईल.
- मर्ढेकरांच्या काव्यशैलीचे विशेष ध्यानात येतील.

## २.१ प्रास्ताविक

१८१८ मध्ये पेशवाई बुडाली आणि इंग्रजी अम्मल सुरू झाला आणि १९४७ मध्ये भारत पुनः स्वतंत्र झाला. १८१८ ते १८८५ या कालखंडातील कविता ही केशवसुत-पूर्वकालातील कविता होय.

कवितेच्या अभ्यासासाठी सामान्यतः पुढील कालखंड कल्पिले जातात.

| | |
|---|---|
| १८१८ ते १८८५ | केशवसुतपूर्वकाल; भाषांतरित कविता विपुल |
| १८८५ ते १९२० | केशवसुतकाल. आधुनिक काव्यात क्रान्ती आत्मनिष्ठ स्फुट कविता. कवितेतील आशय, तिची अभिव्यक्ती, तिची शैली बदलली. इंग्रजी कवितेच्या परिशीलनाने वळण बदलले |
| १९२० ते १९४५ | रविकिरणमंडळ काल |
| १९४५ ते १९६० | मर्ढेकर काल |

१९४७ साली बा. सी. मर्ढेकर यांचा 'काही कविता' हा संग्रह प्रकाशात आला. नंतर 'आणखी काही कविता' हा संग्रह प्रसिद्ध झाला.

मर्ढेकर मानवाचे अंतर्विश्व आणि बाह्यविश्व यातील नात्याचा शोध घेत होते.

दुसऱ्या महायुद्धातील संहारक अस्त्रांनी मानवी अस्तित्वाबद्दल अनेकांना अंतर्मुख केले. मर्ढेकरांना वाटले की माणूस असहाय दुबळा, एकाकी आहे. त्याचे जीवन संज्ञाशून्य किंवा बधिर झालेले आहे. त्याला प्रामाणिकपणे वाटते की कशातच काही अर्थ नाही, सारे यांत्रिक आहे. एका दृष्टीने विज्ञानतंत्रज्ञान झपाट्याने विकसित होणाऱ्या जगात माणसाचे जीवन यंत्रनियमित होत आहे आणि त्याने शतकानुशतके कवटाळलेली जीवनमूल्ये पार उद्ध्वस्त झाली आहेत.

मर्ढेकरांनी नव्या जाणिवा नव्या भाषेतून मांडल्या. ही भाषा म्हणजे प्रतिमांची भाषा.

## २.२ शब्दार्थ आणि टीपा

**गिरिधर** – श्रीकृष्ण. गोवर्धन पर्वत श्रीकृष्णाने आपल्या करंगळीवर उचलून धरला ही कथा या नावाच्या मागे आहे.

**दणकट** – बळकट

**काळाकभिन्न** – अत्यंत काळा

**साग** – वृक्षप्रकार

**धगधगणे** – रसरसणे, प्रज्वलित होणे

**शिसवी** – एक प्रकारचे लाकूड

**पॉलिशलेली** – 'पॉलिश' या इंग्रजी शब्दापासून तयार केलेले विशेषण. मर्ढेकरांच्या काव्यभाषेचा हा एक विशेष. 'पंक्चरलेली' असा शब्द अन्य कवितेत त्यांनी योजला आहे.

**टणक** – कठिण, कडक

**पवित्रा** – तयारीत असणे

**लीलया** – सहज

**भाल** – कपाळ

**स्थाणुभाव** – भक्कम, स्थिरभाव

## २.३ कवितेचे अध्ययन

बा. सी. मर्ढेकरांची ही कविता वाचा. नीट मनन करा.

### नव्या मनूतिल गिरिधर पुतळा

दणकट दंडस्नायू जैसे
लोखंडाचे वळले नाग,
कभिन्न काळ्या मांड्या जैसा–
पोलादाचा चिरला साग

धगधगणाऱ्या भट्टी पुढल्या
प्रकाशात ही तळपे कांति
जशी ओलसर शिसवी – नक्षी
पॉलिशलेली चांदण्यात ती

टणक कोळसा पवित्र्यांत हा
खोरुनि घेई पावड्यात अन्
झोकुनि देई पहा लीलया
तसाच भट्टित अचूक झरकन
आणि फुरफुरे भट्टी जैसी
हले सावली प्रकाश तैसा
भालावरला रुमाल शुभ्र
जिरवुन घेई घाम जरासा

यंत्रयुगातील नवनृत्याचा
स्थाणुभाव हा प्रगटे येथे
मनोज्ञ मुद्रा शिल्पित एक
संगमरवरी मांसामध्ये

अहा कोळसेवाला काळा!
नव्या मनूतिल गिरिधर पुतळा

### २.३.१ यंत्रयुगातील प्रतिमाचित्र

मर्ढेकरांना महायुद्धोत्तर वास्तवाची अचूक जाणीव होती. महायुद्धामुळे विज्ञानाचे भीषण संहारक सामर्थ्य लक्षात आले पण या युद्धाने मनुष्यहानीबरोबर जी माणुसकीची हानी केली त्यामुळे मर्ढेकरांचे मन अस्वस्थ होते. यंत्रयुग अवतरणे अपरिहार्य होते. पण त्यामुळे जीवनात यांत्रिकता, कृत्रिमता आणि अमानुषपणा आला त्याची मर्ढेकरांना चिंता वाटली.

'अहा कोळसेवाला काळा!' हे त्यांचे उद्गार त्यांच्या मनातील चिंतेचे दर्शक आहेत. यंत्र ऊर्जाशक्तीवर चालते. त्या भट्टीत विशिष्ट पवित्रा घेऊन कोळशाची फावड्याने भर घालणारा नव्या मनुतिल गिरिधर पुतळा तर नव्हे! मर्ढेकरांची कविता केवळ समकालीन वास्तवाचे प्रतिबिंब निर्माण करीत नाही. ती जीवनासंबंधी प्रश्नचिंता व्यक्त करते. हा काळा कोळसेवाला धगधगणाऱ्या भट्टीपुढे उभा आहे. त्याची अंगकांती भट्टीच्या प्रकाशात तळपत राहते. तिचे चित्र रेखाटताना ते लिहितात–

'जशी ओलसर शिसवी–नक्षी
पॉलिशलेली चांदण्यात ती'

भट्टीची धग कायम ठेवण्यासाठी फावड्या मागून फावडी भट्टीत झरझर रिती केली पाहिजे. त्यामुळे अंग घामेघूम होते, पण त्याला इलाज नाही. भट्टीसमोर यांत्रिक हालचाली करणाऱ्या कोळसेवाल्याचे 'दणकट दंडस्नायू' पाहून त्यांना वाटते की लोखंडाचे वळलेले नागच आहेत हे. तर काळ्या कभिन्न मांड्या पाहून मनात येते की पोलादाचा सागच चिरलेला आहे. दणकट दंडस्नायू असलेला नव्या मनूतील गिरिधर पुतळा अगदी सहज शब्दशिल्पित होतो. मर्ढेकरांच्या कवितेत सतत वेदनेची इंद्रायणी वाहत असते. मर्ढेकरांच्या कवितेतील प्रतिमा या रांगोळीच्या ठिपक्यांसारख्या असतात. त्यातील रेषा अदृश्य असतात. ही कविता म्हणजे एक संपूर्ण सलग असे प्रतिमाचित्र आहे. कवितेतील आशयाचे रूप आणि प्रत्यक्ष शब्दरूप यांचे नाते असते. रसिकाने शब्दरूपापासून मूळ अनुभवाच्या गाभ्यापर्यंत जायचे असते. या कोळसेवाल्याचे रेखाचित्र हे बाह्यरूप. यंत्रयुगातले हे नवनृत्य आणि त्या नृत्यातील मनोज्ञ शिल्पित

मुद्रा पाहताना जाणवते ती यंत्रयुगाची भयावहता, यंत्रयुगाने आणलेली कृत्रिमतेची, त्याच – त्यापणाची अवकळा!

## २.३.२ कवितेची रूपचिकित्सा

मर्ढेकरांच्या कवितेचे रूप कसे आहे?
ते कसे आणि कोणत्या क्रमाने जाणवते?

पु. शि. रेगे यांनी कवितेचा रूपविस्तार तीन अवस्थांमध्ये वर्णिला आहे तो लक्षात घ्या.

१. **प्राकृतिक रूप** : शब्दांचे श्रवण करावे, अवलोकन करावे आणि पुनः पुनः वाचन करावे. (Physical)
२. **प्रतिमांकित रूप** : शब्दांकित कवितेची परिणती अर्थापेक्षेत होते. (Representational)
३. **मनोनीत रूप** : रसिकाच्या व्यक्तिवैशिष्टयानुसार प्रतिमांकित रूपाबाबत प्रतिक्रिया निर्माण होतात. (Conceptual)

नाद, संकेत, शब्द, अनुसंधान, अर्थ व रूप अशा सहा अवस्थांमधून कवितेचे रूप जाणवते हेही लक्षात घ्या.

## २.३.३ काव्यभाषेचे स्वरूप

काव्यभाषेसंबंधी खालील मुद्दे विचारात घेऊन ही कविता अभ्यासावी.

१) काव्यभाषा व्यक्तिविशिष्ट असते.
२) कवितेतील भावानुभवाला समूर्त, साकार करण्याचे काम काव्यभाषेचे.
ज्ञानेश्वर म्हणतात, ना – ' बोलीं अरुपातें रूप दावीन'
३) काव्यभाषेत रूपकादी अलंकार, प्रतीक आणि प्रतिमा यांना स्थान असते.
४) काव्यभाषा सूचक असते.

## २.३.४ प्रतीक आणि प्रतिमा

प्रतीक आणि प्रतिमा यांचे स्वरूप समजावून घ्या.
दोन्हीमुळ भाषेचे सौंदर्य व सामर्थ्य वाढते.

| प्रतीक | प्रतिमा |
|---|---|
| कोणत्या तरी वस्तूचे प्रतिनिधित्व करते.<br>वस्तुनिर्देश निश्चित असतो<br>एकच विवक्षित अर्थसूचित होतो. ते प्रायः योजलेले व आरोपित असते<br>त्याला लोकमान्यता, समाजसापेक्षता व सांस्कृतिक परंपरा असते. | प्रतिमेचे स्वरूप संश्लिष्ट, गुंतागुंतीचे आणि व्यक्तिनिष्ठ<br>ती कवीच्या अंतरंग-प्रक्रियेची सचित्र निर्मिती<br>प्रतिमेची व्यंजना विविध भावछटांनी संकुल.<br>ती एकांतिक, व्यक्तिगत व कविसापेक्ष असते.<br><br>स्वयंभूपणा, मौलिकता आणि सेंद्रियत्व ही वैशिष्टचे<br>कवीचा भावानुभवच चित्ररूप होतो. |

## २.३.५ मर्ढेकरांची काव्यशैली

आपला अनुभव वेगळा आहे, अर्थपूर्ण आहे ही जाणीव मर्ढेकरांप्रमाणे प्रत्येक कवीची असते. वेगळेपणा व्यक्त झाल्याशिवाय खरा आत्माविष्कार झाला असे पूर्णतेचे समाधान कवीला प्राप्त होत नाही. हा वेगळेपणा अनुभवाच्या तीव्रतेची मात्रा आणि गुणवत्ता यावर अवलंबून असतो.
या दृष्टीने मर्ढेकरांच्या कवितेतील अनुभव वेगळा कसा आहे ते शोधा.

(अ) मर्ढेकरांच्या काव्यशैलीचा अभ्यास करणे आवश्यक आहे.
आपण काव्यशैलीचा अभ्यास किती प्रकारे करू शकतो?
१. शैली हे रचनेचे तत्त्व मानून लेखकाच्या दृष्टिकोनातून विचार करता येईल.
२. शैलीचा वस्तुनिष्ठ अभ्यास म्हणजे काव्यसंहितेची चिकित्सा. येथे संहितेव्यतिरिक्त अन्य संदर्भाचा, रसिकाच्या प्रत्ययाचा विचार करावयाचा नाही.

३. रसिकाच्या प्रत्ययावर आधारलेले मूल्यमापन विचारात घेऊन शैलीचा अभ्यास.

या तिन्ही प्रकारचा अभ्यास या कवितेच्या संदर्भात करून बघा.

(ब) या कवितेतील 'विशेषण-विशेष्य' संबंध पाहा.

दणकट दंडस्नायू — टणक कोळसा
धगधगणारी भट्टी — संगमरवरी मांस
मनोज्ञ मुद्रा

यातील 'अर्थपूर्णता' स्पष्ट करा.

(क) 'शब्द' कवितेत महत्त्वाचा. अभिधा, लक्षणा, व्यंजना अशा तीन शब्दशक्ती संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी मानल्या आहेत.

शब्दांचे स्थान बदलणे, ओळीतून शब्द तोडून त्या शब्दांची स्वतंत्र ओळ करणे या मार्गाने मर्ढेकर शब्दांचे भान वाढवतात.

या ओळी वाचा –

भालावरला रुमाल शुभ्र
जिरवुन घेई घाम जरासा

यातील 'घाम' शब्दाचे स्थान 'भालावरला' या शब्दानंतर होते. ते बदलल्यामुळे 'घाम' या शब्दाचे भान निर्माण झाले. 'शुभ्र रुमाल' हा अनुक्रम पाळण्याऐवजी विशेष्य आधी, विशेषण नंतर अशी योजना मर्ढेकर करतात.

'पॉलिशलेली' हा शब्द बघा.

इंग्रजी शब्द 'पॉलिश'. त्यापासून मराठी प्रत्यय लावून तयार केलेले विशेषण रूप मर्ढेकर योजतात. 'पंक्चरलेली' असे एक रूप मर्ढेकरांच्या कवितेत आढळते.

जसे –

**पंक्चरली** जरी रात्र दिव्यांनी
कुणी **पंपतो** हा काळोख.

एक इंद्रिय संवेदना ही दुसऱ्या इंद्रिय संवेदनेकडे किंवा इंद्रियसंवेद्य वस्तूंकडे संक्रमित करणे हा मर्ढेकरांचा विशेष. जसे काळा वास, भुरी शांतता या कवितेत 'ओलसर शिसवी-नक्षी' हा प्रयोग आहे.

उपमेय–उपमान संबंध मर्ढेकर कसा योजतात तो पाहा.

१. दणकट दंडस्नायू जैसे लोखंडाचे वळले नाग
२. कभिन्नकाळ्या मांड्या जैसा पोलादाचा चिरला साग
३. प्रकाशात ही तळपे कांती जशी ओलसर शिसवीनक्षी
४. फुरफुरे भट्टी जैसी हले सावलीप्रकाश तैसा

तुकारामांनी 'अभंगा'ला अर्थपूर्णता आणली. मर्ढेकरांनी 'पादाकुलक' या मात्रावृत्ताला अर्थपूर्णता आणली.

मर्ढेकरांच्या कवितेत अर्थानुगामी, अर्थसमृद्ध लय आहे. त्यांना 'दर्शनीलयी' पेक्षा 'अंतर्गत लय' असणे आवश्यक वाटे.

उदा.
उदासतेला जहरी डोळे
काचेचे पण;
मधाळ पोळे
ओठावरती जमले तेही
बेकलादूरी, बेकलाईटी!

या कवितेत लयीची सुंदर जाणीव होणाऱ्या ओळी वाचा. या लयीमुळे कोळसेवाल्याचे चित्र गोचर होते.

टणक कोळसा पावित्र्यात हा
खोरुनि घेई पावड्यात अन्
झोकुनि देई पहा लीलया
तसाच भट्टित अचूक झरकन

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(क) 'नव्या मनुतिल गिरिधर पुतळा' असे कोणाला उद्देशून म्हटले आहे?

......... .........................................................................................

(ख) खालील गोष्टींचे वर्णन कोणत्या 'उपमा' देऊन कवीने केलेले आहे?

| | |
|---|---|
| दणकट दंडस्नायू | |
| काळ्या कभिन्न मांड्या | |
| फुरफुरणारी भट्टी | |

(ग) भट्टीत कोळसा फेकणाऱ्या काळ्या कोळसेवाल्याचे वर्णन करणाऱ्या ओळी कोणत्या?

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

(घ) 'विशेषण–विशेष्य' वाचक शब्द शोधा.

| **विशेषण** | **विशेष्य** |
|---|---|
| काळ्याकभिन्न | मांड्या |
| | |
| | |
| | |

## २.४ नमुना उत्तरे

(क) काळा कोळसेवाला

(ख) लोखंडाचे वळले नाग
पोलादाचा चिरला साग
हले सावली-प्रकाश

(ग) टणक कोळसा................. अचूक झरकन

(घ) काळ्या कभिन्न मांड्या
मनोज्ञ मुद्रा
टणक कोळसा
धगधगणारी भट्टी

## २.५ अधिक अध्ययन

### २.५.१ कवि-परिचय

बाळ सीताराम मर्ढेकर (१९०९–१९५६) नवकवितेचे आद्य प्रवर्तक. 'शिशिरागम', 'काही कविता', 'आणखी काही कविता' हे त्यांचे काव्यसंग्रह. 'पाणी', 'रात्रीचा दिवस' या त्यांच्या कादंबऱ्या. 'बदकाचं गुपित', 'कर्ण' या संगीतिका.
'सौंदर्य आणि साहित्य' या समीक्षाग्रंथामुळे मराठीत सौंदर्यशास्त्राच्या चर्चेला गती मिळाली.
यंत्रयुगातील गतिमानतेत माणुसकी हरवल्याची जाणीव ते व्यक्त करतात.

## २.६ सारांश

या कवितेत कोळसेवाल्याची प्रतिमा चित्रित केली आहे. ही यंत्रयुगाची प्रतिमा आहे. धगधगणाऱ्या भट्टीत कोळसा फेकत राहणाऱ्याचे चित्र अतिशय समर्पक शब्दांत कवींनी रेखाटलेले आहे. त्याचे दणकट दंडस्नायू, त्याच्या काळचा कभिन्न मांड्या, त्याची उभे राहण्याची पद्धत, भट्टीत कोळसा फेकीत राहण्याचे कंटाळवाणे काम, कवी चित्रमयी शैलीने वर्णन करतात. त्याला पाहून त्यांना वाटते की हा नव्या मनूतील गिरिधर पुतळाच आहे.

## २.७ सरावासाठी स्वाध्याय

१. मर्ढेकर आणि केशवसुत यांच्या कवितालेखनाविषयी तुलनात्मक विवेचन करा.
२. यंत्रयुगाच्या दुष्परिणामाबद्दल एक परिच्छेद लिहा.
३. 'मानव आणि यंत्रयुग' या विषयावर निबंध लिहा.

## २.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. **मर्ढेकरांची कविता** – धों. वि. देशपांडे
२. **मराठी कविता स्वरूप आणि विवेचन** – प्रा. नि. शं. ठकार
३. **मराठी भाषा आणि शैली** – डॉ. रमेश धोंगडे – सौ. धोंगडे
४. **मर्ढेकरांची कविता** (समग्र कविता) – मौज प्रकाशन.